# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

## मराठी विभाग

सकाळ

# पवार चॅरिटेबल ट्रस्टतर्फे ६३ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

**राजगुरुनगर, ता. १९ :** येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबराव बुट्टे पाटील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पवार चॅरिटेबल ट्रस्टतर्फे शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले. यामध्ये ६३ गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना सुमारे ३ लाख २२ हजार रुपयांचे वाटप करण्यात आले.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी येथील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी पवार चॅरिटेबल ट्रस्टतर्फे कायम ठेव ठेवली आहे. त्या ठेवीतून सावित्रीबाई फुले, शारदाबाई पवार, साहेबराव बुट्टे पाटील आणि दत्तात्रेय वळसे पाटील यांच्या नावाने शिष्यवृत्तीचे वाटप नुकतेच करण्यात आले.

या वेळी मागास, आदिवासी, आर्थिक दुर्बल; तसेच निराधार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. तालुक्यातील गुणवंत विद्यार्थी आर्थिक अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी या विद्यार्थ्यांची निवड केल्याचे बुट्टे पाटील यांनी सांगितले.

या प्रसंगी संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक गणेश जोशी, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य एस. एन. टाकळकर, डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्रबंधक कैलास पाचारणे आदी उपस्थित होते. प्राचार्य जरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. धनंजय बोऱ्हाडे यांनी सूत्रसंचालन केले; तर प्रा. बापूसाहेब चौधरी यांनी आभार मानले.



**राजगुरुनगर (ता. खेड) : पवार चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने देण्यात येणारी शिष्यवृत्ती स्वीकारताना विद्यार्थिनी.**

Pune, District-Today
20/11/2019 Page No. 8

लोकमत


६३ मुलांना मदत : ३लाख २२ हजार रुपयांचे धनादेश सुपूर्त; समाजातील दुर्बल घटकांसाठी योजना

# राजगुरुनगरात गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हुतात्मा राजगुरु महाविद्यालय व साहेबराव बुट्टे पाटील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ३ लाख २२ हजार रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात आली.

पवार चॅरिटेबल ट्रस्टतर्फे सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, शारदाबाई पवार शिष्यवृत्ती, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय साहेबरावजी बुट्टे पाटील यांच्या स्मरणार्थ साहेबराव बुट्टे पाटील शिष्यवृत्ती व आमदार दिलीप वळसे पाटील यांच्या वडिलांच्या स्मरणार्थ दत्तात्रय वळसे पाटील शिष्यवृत्ती वाटपाचा कार्यक्रम खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या सभागृहात झाला. कार्यक्रमासाठी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर ,मानद सचिव हरि सांडभोर, ज्येष्ठ संचालक एअर कमोडर गणेश जोशी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, साहेबराव बुट्टे पाटील महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शिल्पा जगताप, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य एस. एन. टाकळकर, वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्रबंधक के. आर. पाचारणे, विभागप्रमुख बापूसाहेब चौधरी, अशोक थिगळे, शिक्षकवृंद, शिष्यवृत्तीप्राप्त विद्यार्थी आदी या वेळी उपस्थित होते. आई-वडील नाहीत असे विद्यार्थी तसेच मागास प्रवर्गात मोडणारे विद्यार्थी, आदिवासी भागातील विद्यार्थी व आर्थिक दुर्बल विद्यार्थी यांना हा लाभ देण्यात आला.



शिष्यवृत्तीप्राप्त विद्यार्थ्यांना देवेंद्र बुट्टे पाटील यांनी धनादेश वाटप केले.

> खेड तालुक्यातील ग्रामीण भागातील आर्थिक मागास विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे सुलभ व्हावे, यासाठी या शिष्यवृत्तीचा उपयोग केला जात आहे. शिष्यवृत्तीचा उपयोग विद्यार्थ्यांनी शैक्षणिक उपयोगासाठी व गरजेसाठी करावा.
>
> - देवेंद्र बुट्टे पाटील, अध्यक्ष, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ.

सावित्रीबाई फुले शिष्यवृत्तीसाठी एकूण पंधरा विद्यार्थिनींची निवड करण्यात आली. एकूण ७४ हजार रुपयांची शिष्यवृत्ती त्यासाठी प्रदान करण्यात आली. शारदाबाई पवार शिष्यवृत्ती अंतर्गत एकूण १६ विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती देण्यात आली व एकूण ८४ हजार रुपयांची शिष्यवृत्ती वाटप करण्यात आली. साहेबरावजी बुट्टे पाटील शिष्यवृत्ती अंतर्गत एकूण १६ विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती देण्यात आली व यासाठी एकूण ६६ हजार पाचशे रुपये वाटप करण्यात आले.

दत्तात्रय वळसे पाटील शिष्यवृत्ती अंतर्गत एकूण १६ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली व त्यासाठी ९८ हजार रुपये रक्कम वाटण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी केले. सूत्रसंचालन प्राध्यापक डी. व्ही. बोऱ्हाडे यांनी केले. आभार प्रदर्शन कला विभाग प्रमुख बापूसाहेब चौधरी यांनी केले.

# खेडमधील ६३ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप

## ३ लाख २२ हजार ५०० रुपयांच्या धनादेशाचे वाटप

**राजगुरूनगर, दि. १९ (प्रतिनिधी)** - खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबराव बुट्टे पाटील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या ६३ गरिब व हेतकरू विद्यार्थ्यांना विविध संस्थांच्या शिष्यवृत्तीचे एकूण ३ लाख २२ हजार ५०० रुपयांच्या धनादेशाचे नुकतेच वाटप करण्यात आले.

लोकनेते शरद पवार यांच्या पवार चॅरीटेबल ट्रस्टतर्फे देण्यात येणाऱ्या प्रथम शिक्षिका सावित्रीबाई फुले यांचे स्मरणार्थ 'सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती', लोकनेते शरदरावजी पवार यांच्या मातोश्री शारदाबाई पवार यांच्या स्मरणार्थ 'शारदाबाई पवार शिष्यवृत्ती', खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष स्व. साहेबरावजी बुट्टे पाटील यांच्या स्मरणार्थ 'साहेबराव बुट्टे पाटील शिष्यवृत्ती' व आंबेगाव तालुक्याचे आमदार दिलीप वळसे पाटील यांच्यावडिलांच्या स्मरणार्थ 'दत्तात्रेय वळसे पाटील शिष्यवृत्ती' वाटपाचा कार्यक्रम नुकताच खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या सभागृहांमध्ये पार पडला. याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, गणेश जोशी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, साहेबराव बुट्टेपाटील महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शिल्पा जगताप, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य एस. एन. टाकळकर, वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्रबंधक के. आर. पाचारणे, विभाग प्रमुख बापूसाहेब चौधरी, अशोक थिगळे यांच्यासह प्राध्यापक शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी उपस्थित होते.



**राजगुरूनगर : हुतात्मा राजगुरू महाविद्यायात शिष्यवृत्तीचे धनादेश विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.**

> शरदरावजी पवार यांनी या संस्थेला भेट दिली त्यावेळी संस्थेत शिकणारे विद्यार्थी हे गरीब आणि शेतकरी कुटुंबातले असल्याने त्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्यासाठी व त्यातून प्रेरणा घेऊन गरीब होतकरू विद्यार्थ्याला शिक्षणाची संधी मिळण्यासाठी ही शिष्यवृत्ती सुरू केली आहे. खेड तालुक्यातील ग्रामीण भागातील आर्थिक मागास विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे सुलभ व्हावे यासाठी या शिष्यवृत्तीचा उपयोग केला जात आहे.
>
> **-ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील,** अध्यक्ष,खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ

| शिष्यवृत्ती | पात्र विद्यार्थी | शिष्यवृत्ती प्रदान (रुपयांत) |
|---|---|---|
| सावित्रीबाई फुले | १५ | ७४ हजार |
| शारदाबाई पवार | १६ | ८४ हजार |
| साहेबरावजी बुट्टे पाटील | १६ | ६६ हजार ५०० |
| दत्तात्रय वळसे पाटील | १६ | ९८ हजार |
| एकूण | ६३ | ३ लाख २२ हजार ५०० |

पुढारी

# हुतात्मा महाविद्यालयात शिष्यवृत्तीचे वाटप

**राजगुरुनगर : प्रतिनिधी**

राजगुरुनगर (ता. खेड) येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचालित हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबराव बुट्टे पाटील महाविद्यालयात सोमवारी (दि १८) विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.

पवार चॅरिटेबल ट्रस्टतर्फे देण्यात येणाऱ्या सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, शारदाबाई पवार शिष्यवृत्ती, साहेबराव बुट्टे पाटील शिष्यवृत्ती व दत्तात्रेय वळसे पाटील शिष्यवृत्ती या शिष्यवृत्तींचे या वेळी वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक गणेश जोशी, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, साहेबराव बुट्टे पाटील महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शिल्पा जगताप, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य एस. एन. टाकळकर, वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्रबंधक के. आर. पाचारणे, विभाग प्रमुख बापू चौधरी, अशोक थिगळे, सर्व शिक्षकवृंद, शिष्यवृत्तिप्राप्त विद्यार्थी उपस्थित होते.

एकूण ३ लाख २२ हजार ५०० रुपये शिष्यवृत्ती वाटप करण्यात आली. प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डी. व्ही. बोऱ्हाडे यांनी सूत्रसंचालन केले. कला विभागप्रमुख बापू चौधरी यांनी आभार मानले.



**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या सभागृहात शिष्यवृत्तीचे वाटप करताना मान्यवर.**

My Gramin Edition
20 Nov, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख